# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई माहिती अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम ४(१) (ख) नुसार

### १. संस्थेच्या कामकाजाची व कर्तव्यांची संपूर्ण माहिती.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे मुख्य कार्य आधुनिक औषधी पध्दतीमधील वैद्यकीय पदवीधारकांना नोंदणी देणे व अशा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींवर नियंत्रण ठेवणे असे आहे. यासाठी आचारसंहिता विहीत करण्यात आली असून या व्यतिरिक्त भारतीय आर्युविज्ञान परिषदेने वैद्यकीय आचारसंहिता विहीत केली आहे. या आचारसंहितेचे वैद्यकीय व्यवसायींकडून पालन होते किंवा कसे हे पाहणे ही परिषदेची जबाबदारी असल्यामुळे त्या अनुषंगाने वैद्यकीय व्यवसायी विरुध्द या परिषदेकडे अनेक तक्रारी प्राप्त होतात. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ चे कलम २२ अंतर्गत या परिषदेला वैद्यकीय व्यवसायी विरुध्दच्या तक्रारींची चौकशी करुन दोषी वैद्यकीय व्यवसायींना शिक्षा करण्याचे अधिकार देण्यात आले असून यासाठी या परिषदेला समन्यायीक अधिकार प्राप्त आहेत. तसेच, वैद्यकीय व्यवसायी विरुध्दच्या तक्रारींची चौकशी करण्याप्रकरणी दिवाणी न्यायालयात प्रकरणे चालविण्यासाठी विहीत केलेली पध्दती (Civil Procedure Code ) या परिषदेला लागू करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| कार्यालयाचे नाव व पत्ता | : | महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई<br>१८९/अे आनंद कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, साने गुरुजी मार्ग, ऑर्थर रोड नाका, चिंचपोकळी (पश्चिम), मुंबई-४०००११. |
| कार्यालय प्रमुख | : | प्रबंधक |
| निमशासकीय विभागाचे नाव | : | महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई |
| कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनस्त | : | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ |
| कार्यक्षेत्र / भौगोलिक /कार्यानुरुप | : | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| विशिष्ट कार्ये | : | महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे मुख्य कार्य आधुनिक औषधी पध्दतीमधील वैद्यकीय पदवीधारकांना नोंदणी देणे व अशा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायींवर नियंत्रण ठेवणे. |
| विभागाचे ध्येय / धोरण | : | नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकांसाठी आलेल्या आचारसंहितेप्रमाणे नोंदणीकृत व्यवसायीकांवर नियंत्रण ठेवणे |
| सर्व संबंधीत कर्मचारी कामाचे विस्तृत स्वरुप | : | याबाबतची माहिती सोबतच्या प्रास्ताविकात व विषय सूचीत दर्शविण्यात आलेली आहे. संपूर्ण कार्यक्रमांची विवरणे |
| कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक व कार्यालयीन वेळ | : | २३०७२४६४, २३०५३०४३<br>सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.३० वा.पर्यत |
| साप्ताहीक सुट्टी व विशिष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळा | : | प्रत्येक महिन्यातील दुसरा व चौथा शनिवार व सर्व शासकीय सुटयांचे दिवशी कार्यालय बंद राहील. |
| वैद्यकीय व्यावसायीकांकरिता नोंदणीची व नुतणीकरणाची वेळ | : | सोमवार ते शुक्रवार<br>सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० पर्यत. |

..२..

# वैद्यकीय व्यवसायाकांकरिता वैद्यकीय शुल्क आकारणी तक्ता खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ. क्र. | संबंधीत कामे | शुल्क | वैद्यकीय प्रमाणपत्रे निर्गमित करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १) | तात्पुरत्या वैद्यकीय प्रमाणपत्रांची नोंदणी (Provisional Registration) | ५००/- | ३० दिवस |
| २) | कायम वैद्यकीय प्रमाणपत्रांची नोंदणी ((Permanent Registration) | २०००/- | ३० दिवस |
| ३) | पदवीव्युत्तर पदवी / पदवीका नोंदणी प्रमाणपत्रे (Additional Qualification Registration) | १२०/- | ३० दिवस |
| ४) | पत्र प्रमाणपत्रे ((Letter Certificate ) | ७०/- | ७ दिवस |
| ५) | ना हरकत प्रमाणपत्रे (No Objection Certificate | ७०/- | ७ दिवस |
| ६) | भारतीय आर्युविज्ञान परिषदेकडे पाठवावयाचे चांगल्या वर्तणूकीचे प्रमाणपत्र (MCI Good Standing ) | १२०/- | ७ दिवस |
| ७) | इतर देशांतून प्राप्त झालेले संदर्भ (City Form ) | १२०/- | ७ दिवस |
| ८) | महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे चांगल्या वर्तणूकीचे प्रमाणपत्र (Good Standing Certificate ) | १२०/- | ७ दिवस |
| ९) | नावांत बदल (Change of Name ) | ७०/- | ७ दिवस |
| १०) | प्रमाणपत्रांची नक्कल (दूसरी प्रत)<br>Provisional Duplicate Certificate<br>Permanent Duplicate Certificate<br>Additional Duplicate Certificate | १२०/- (प्रत्येकी) | ७ दिवस |
| ११) | दुय्यम ओळखपत्र (Duplicate I - Card ) | १००/- | ७ दिवस |
| १२) | वैद्यकीय नोंदणीचे प्रमाणपत्रांचे नुतणीकरण (Renewal of Registration) | ५००/- अधिक विलंब आकार दरमहा १००/- | ३० दिवस |

२ व ३ अधिका-यांचे व कर्मचा-यांचे अधिकार/ निर्णय घेण्याचे अधिकार व जबाबदारी

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम,१९६५ प्रकरण ४ कलम १४ मध्ये परिषदेच्या प्रबंधकांचे अधिकार / कर्तव्ये व जबाबदारी खाली दिल्याप्रमाणे नमूद केली आहेत.

अ) प्रबंधक हा परिषदेचा सचिव आणि कार्यकारी अधिकारी असेल. त्याने परिषदेच्या आणि तिच्या कार्यकारी समित्यांच्या सर्व सभांना उपस्थित राहिले पाहिजे. अशा सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांची नांवे व अशा सभातील कामकाज यांचे कार्यवृत्त ठेवले पाहिजे.

ब) परिषदेचे विहीत लेखे ठेवले पाहिजे.

क) प्रबंधकास कर्मचारी वर्गावर विहीत करण्यात येतील असे पर्यवेक्षकीय अधिकारी चालविता येतील.

ड) नियुक्त प्रबंधक हा भारतीय दंड संहितेच्या कलम २१ अर्थानुसार लोकसेवक असल्याचे समजण्यात येईल.

इ) कर्मचा-यांना स्वतंत्र अधिकार नाहीत.

**४. कामकाजाची कार्यपध्दती :-**

कामकाजाची कार्यपध्दती क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे

**५. अधिकारात येणारे नियम, परिपत्रके, सूचना :-**

अ) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम,१९६५
ब) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम, १९६७

**६. खात्याच्या अखत्यारीत येणारे कागदपत्रे :-**

अ) नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकांची नोंदणी विषयक संपूर्ण माहिती.
ब) नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकांच्या विरुध्दच्या तक्रारी व त्यावरील सुनावणी व निर्णय.
क) इतर शासकीय पत्रव्यवहार

**७. सल्लामसलतीसाठी यंत्रणा व जनतेसाठी मार्गदर्शनाची कार्यपध्दती :-**

परिषदेच्या कार्यालयात प्रबंधक /उपप्रबंधक कार्यालयीन वेळेत सल्लामसलतीसाठी व मार्गदर्शनासाठी उपलब्ध असतील.

**८. जनतेसाठी खात्यांतर्गत स्थापण्यात आलेल्या समित्या व त्यांची कार्यपध्दती :-**

खात्यांतर्गत समिती सध्या अस्तित्वात नाही.

## ९ खात्यांतील अधिकारी व कर्मचारी यांच्या नावांची सूची :-

| अनु.क्र. | अधिकारी / कर्मचारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. डी. एन. लांजेवार | प्रशासक |
| २ | श्री. आर. जी. जंजाळ | प्रबंधक |
| ३ | श्री. अे. जी. रेडेकर | उप-प्रबंधक |
| ४ | श्री. राजाराम सावंत | कॉम्प्युटर - सुपवायजर कम प्रोग्रामर |
| ५ | श्रीमती. शालीनी निकम | लिपिक-टंकलेखक |
| ६ | श्री. अशोक अहिरे | लिपिक-टंकलेखक |
| ७ | श्री. उल्का होरांबे | लिपिक-टंकलेखक |
| ८ | श्रीमती.रुची महाडीक | लिपिक-टंकलेखक |
| १० | श्री. तुकाराम वीर | लिपिक-टंकलेखक |
| ११ | रिक्त | लिपिक |
| १२ | रिक्त | शिपाई |
| १३ | श्री. शरद घोले | शिपाई |
| १४ | श्री. दिनेश महाडीक | शिपाई |

## १०. खात्यातील अधिकारी व कर्मचा-यांना उपलब्ध असलेली मासिक प्राप्ती भरपाई इ :-

या परिषदेच्या वर नमूद कर्मचारी वृदांना शासकीय कर्मचा-यांना देण्यात येणारी वेतन व भत्ते नियमानुसार अदा करण्यात येतात.

## ११. खात्याच्या विनियोगासाठी वेगवेगळी उपलब्ध निधी, योजना, खर्चाच्या तरतूदी व वापर :-

या परिषदेच्या उत्पन्नात वैद्यकीय व्यवसायींकडून प्राप्त होणारी नोंदणी शुल्क ही एकमेव बाब आहे. या परिषदेस राज्य शासनाकडून कोणतेही अनुदान मिळत नाही. या उत्पन्नातून परिषद पुढील प्रयोजनाकरिता खर्च करण्यास सक्षम आहे :-

१. परिषदेच्या प्रबंधकाचे /कर्मचारीवृदांचे वेतन व भत्ते व इतर प्रशासकीय खर्च
२. परिषदेच्या आणि कार्यकारी समितीच्या सभासदांना द्यावयाचा बैठकीचा भत्ता /प्रवास भत्ता न्यायसहायकास द्यावयाचे परिश्रमिक आणि या अधिनियमाखालील कर्तव्ये व कामे पार पाडण्याकरिता आवश्यक असतील असे इतर प्रशासकीय खर्च

## १२. सबसिडी उपलब्ध असल्यास ती माहिती कार्यक्रम व लाभार्थीबाबतची माहिती :-

संबंधीत नाही

## १३. सवलती, परवाने,अधिकार याबाबत जे अधिकार आहेत, ती माहिती :-

आधुनिक औषधी (अॅलोपॅथी ) पध्दतीमधील, वैद्यकीय पदवीधारकांना (डॉक्टरांना) नोंदणी देणे व नोंदणीकृत व्यवसायीकांविरुध्द रुग्णाच्या जवळच्या नातेवाईकांकडून तक्रार प्राप्त झाल्यास महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम,१९६५ च्या कलम २२ अंतर्गत त्याची चौकशी करुन दोषी नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकांना शिक्षा करण्याचे अधिकार परिषदेला आहेत.

**१४. इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती :-**

अ) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे ज्या पदवी /पदवीव्युत्तर वैद्यकीय व्यवसायीकांनी दि.३१.१२.२००९ पर्यत ज्यांच्या नावांची नोंदणी केली आहे, तसेच ज्या वैद्यकीय व्यवसायीकांनी दि.३१.१२.२००९ पर्यत त्यांच्या नोंदणीचे नुतणीकरण केले आहे. अशा सर्व वैद्यकीय व्यावसायीकांची नांवे /शिक्षण /पत्ता इत्यादींची यादी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या www.mmcmumbai.com या वेबसाईटवर जनतेच्या माहितीकरिता प्रसारीत करण्यात आली आहे.

ब) ॲलोपॅथी डॉक्टरांना नोंदणीकरिता आवश्यक असणारी संपूर्ण माहिती वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. (उदा.आवेदनपत्र, शुल्क त्यासंबंधी इतर माहिती)

**१५. नागरिकांना माहिती मिळविण्याबाबतच्या सुविधा, कार्यालयाची वेळ, लायब्ररीची माहिती इ. :-**

नोंदणीकरिता आलेल्या डॉक्टरांना आवश्यक ती मदत केली जाते. डॉक्टरांविरध्द प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत तक्रारदारांना पत्रव्यवहाराद्वारे आवश्यक ती माहिती पुरवणी.

**१६. माहिती अधिका-यांची नावे, पदनामे व अन्य माहिती :-**

| अपिलीय अधिकारी | शासकीय माहिती अधिकारी | सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी |
|---|---|---|
| डॉ.डी.एन.लांजेवार<br>प्रशासक | श्री. आर. जी. जंजाळ<br>प्रबंधक | श्री. आर. ए. सावंत<br>कॉम्प्युटर सुपरवायजर कम प्रोग्रामर |

**१७. खात्याने / संस्थेने निश्चित केलेली अन्य संबंधीत माहिती :-**

दि.३१.१२.२००९ पर्यत नोंदणी /नुतणीकरण केलेल्या सर्व डॉक्टरांची नांवे त्यांची शैक्षणिक अर्हता, पत्ते, नोंदणी क्रमांक ज्या विद्यापीठातून पदवी प्राप्त करुन घेण्यात आली त्या विद्यापीठाचे नांव पदवीप्राप्त झाल्याचे वर्ष याबाबतची सर्व माहिती अद्यावत करण्यात आली आहे.

.............................................................................................